# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,

## महाराष्ट्र राज्य,मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१,२,५ व ६, हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई-४०० ००१ E-mail : mah-sforum@nic.in
दूरध्वनी क्र.२२०७२०९७,२२०५७४०९संकेतस्थळ - http://grahak.maharashtra.gov.in

राआ/आस्था/कक्ष-१ /ससे पदो समिती/२०१६/१०६७ दि. ११ मार्च २०१६

वाचाः- १) अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्र. ग्रासंक-२२१०/प्र.क्र.२६६/ग्रासं-३, दिनांक १६.११.२०१३
२) अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची शासन अधिसूचना दिनांक ३/१/२०१५
३)अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/४८/ प्र.क्र.८/ ग्रासं-४, दिनांक २४/०९/२०१५
४)शासन पत्र क्र.ग्रासंक-२०१५/८२२/प्र.क्र.१५९/ग्रासं-४, दि. २७/०१/२०१६

## कार्यालयीन आदेश

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र,मुंबई यांच्या प्रशासकिय नियंत्रणाखालील अराजपत्रित गट-ब, गट-क व गट-ड या संवर्गातील पदावर अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्र. ग्रासंक-२२१०/ क्र.२६६ /ग्रासं-३, दिनांक १६.११.२०१३ अन्वये ग्राहक संरक्षण यंत्रणा स्वतंत्र करण्यांत आली असून सदर शासन निर्णयान्वये दोन्ही यंत्रणेतील संवर्ग स्वतंत्र करण्यांत आले आहेत.

त्या अनुषंगाने, दिनांक ०३/०१/२०१५ च्या शासन अधिसूचनेन्वये अधिक्षक किंवा जनसंपर्क अधिकारी किंवा शिरस्तेदार (अराजपत्रित -ब), सहायक अधिक्षक, वरिष्ठ लिपिक,वरिष्ठ अभिलेखापाल, अभिलेखापाल, लिपिक-टंकलेखक, बेलिफ गट क या पदाचे सेवाप्रवेश नियम अधिसूचित करण्यांत आले आहेत.

तसेच अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्र. ग्रासंनि-२०१४/प्र.क्र.९६/ग्रासं-४, दि.१६.०८.२०१४ अन्वये लघुलेखक (उश्रे) गट-ब, लघुलेखक (निश्रे) गट-ब, वाहनचालक गट-क, व शिपाई व सफाई कामगार (गड-ड) या पदांचे सेवाप्रवेश नियम सामान्य प्रशासन विभागाने अधिसूचित केल्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याचे निर्दे शित करण्यांत आले आहे.

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१५/

/४८/प्र.क्र.८/ग्रासं-४, दिनांक २४/०९/२०१५ अन्वये अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,महाराष्ट्र,मुंबई यांना ग्राहक संरक्षण यंत्रणेतील प्रशासकिय बाबी हाताळण्यासाठी विभागप्रमुख म्हणून घोषित करण्यांत आले आहे.त्याअनुषंगाने पदोन्नती देण्याकरीता खालीलप्रमाणे राज्यत्रस्तरीय समिती गठीत करण्यांत येत आहे.

गट-ब (अराजपत्रित) व गट-क मधील पदावर पदोन्नतीसाठी राज्यस्तरीय निवड समिती

| धारण केलेले पद | पदोन्नतीचे पद | निवडसमिती |
|---|---|---|
| १. लघुलेखक (नि.श्रे.) | लघुलेखक (उच्चश्रेणी) | १.मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग — अध्यक्ष<br>२.जेष्ठतम न्यायिक सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,मुंबई —सदस्य<br>३. मागासवर्गिय प्रतिनिधी -- सदस्य (राजपत्रित)<br>४.प्रबंधक (प्रशासन)/प्रबंधक(विधी) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई — सदस्य सचिव |
| २.सहायक अधिक्षक | अधिक्षक,जनसंपर्क अधिकारी, शिरस्तेदार | |
| ३.वरिष्ठ लिपिक, वरिष्ठअभिलेखापाल/ अभिलेखापाल | सहायक अधिक्षक | |
| ४. कनिष्ठ लिपिक तथा टंकलेखक,बेलिफ (गट-क) | वरिष्ठ लिपिक,वरिष्ठ अभिलेखापाल/ अभिलेखापाल | |
| ५. शिपाई, रखवालदार, सफाई कामगार (गट-ड) | कनिष्ठ लिपिक तथा टंकलेखक, बेलिफ वाहनचालक | |

(ए.पी.भंगाळे)
अध्यक्ष,
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र राज्य,मुबई

प्रति,

१)मा.मंत्री,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे सचिव

२) मा.राज्यमंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे सचिव

३)मा. सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई ३२

४) प्रबंधक(प्रशासन)/(विधी) राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,मुंबई, नागपूर, औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ

५)जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, सर्व जिल्हे